५

पंचमो पाढो

# भिण्णधम्मियाणं पाणिग्गहणं

वर्तमानकाळात शिक्षणाच्या प्रभावाने आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांचा पुरस्कार केला जात असला तरीही ते या पाठात स्पष्ट केले आहे. ११ व्या शतकातल्या 'मूलशुद्धिप्रकरण' या ग्रंथात देवचन्द्रसूरींनी भिन्न धर्मातल्या वधूवरांचा विवाह शब्दबद्ध केला आहे. ते या पाठात स्पष्ट केले आहे. आपल्या परंपराप्राप्त जिनधर्मावर दृढ श्रध्दा असलेली पत्नी, आपले विचार पतीला तर्कशुद्धपणे पटवून देते. विविध धर्मसंप्रदायांचे सामाजिक अभिसरण जुन्या काळातही कसे होत होते – यावर प्रकाश टाकणारी ही कथा आहे !

---

अत्थि इहेव जंबुद्दीवे दीवे भारहे वासे वच्छाजणवयालंकारभूया कोसंबी णाम णगरी । तत्थ य महाधणवई धणदत्तो णाम सेट्ठी । तस्स य रूवाइगुणगणालंकिया जीवाऽजीवाइ-पयत्थ-वित्थर-वियक्खणा जिणसाहुपयपंकयमहुयरी अत्थि देवई णाम कण्णगा । सा य घरोवरि कंदुगलीलाए ललमाणी दिट्ठा पाडलीउत्त-पुरागय-भिक्खुभत्त-सिरिदत्तसेट्ठिसुएण देवाणंदेणं । तं च दट्ठूण विसमसर-सरपसर-निवाय-विहुरिज्जमाण-माणसेणं चिंतियमणेणं-'अहो ! रूवाइसओ, अहो ! कलाकोसल्लपगरिसो, ता वरावेमि एयं' ति । पेसिया णियपहाणपुरिसा तीए वरणत्थं । 'अण्णधम्मिओ' त्ति काऊण ण दिण्णा पिउणा । तओ तीए लोभेण संजाओ कवडसावगो । णिरंतर-सिद्धंत-आयन्नणाईहि य परिणओ सम्मं धम्मो, जाओ मेरु व्व णिप्पकंपो । तं च तारिसं दट्ठूण दिण्णा पिउणा से कण्णगा । समुव्वूढा य महाविभवेणं । गओ तं घेत्तूण सणगरं । ' भिण्णधम्माणि मायापियाणि' त्ति कयं जुयहरयं । तओ य-

जिणपूयण-वंदण-ण्हवण-जत्त-बलिकरणमाइणिरयस्स ।
सज्झाय-ज्झाणपरायणस्स जइसेवणजुयस्स ॥१॥
पत्तम्मि विविहदाणं देंतस्स कुतित्थिए चयंतस्स ।
जा जाइ कोइ कालो जणणी-जणगाइ ता तस्स ॥२॥
भणियाइं भिक्खुएहिं-'किं सो तुम्हाण संतिओ पुत्तो ।
अच्चंतं भत्तो वि हु णाऽऽगच्छइ अम्ह पासम्मि ?' ॥३॥

तो तेहिं कहिओ सव्वो सवित्थरो से वुत्तंतो । भिक्खुएहिं भणियं – 'जइ एवं ता आणेह कह वि एगवारं, तओ पच्छा भलेस्सामि।' जणणि-जणएहि य भणिओ जहा – 'अम्हऽवरोहेण वि अज्ज णिच्छएणं गंतव्वं।' गुरुणिग्गहछिंडियं च चित्ते भाविऊण गओ सो । वंदिया भिक्खुणो विज्जाभिमंतियं च दिण्णं से तेहिं फलं । पुव्वब्भासेण य भक्खियमणेण । परावत्तियभावो य समागओ गेहं ।

भणियाणि माणुसाणि जहा – 'लहुं मम गिहे भिक्खूण भोयणं सज्जेह ।' तओ हट्ठ-तुट्ठाणि ताणि तहा काउमाढत्ताणि । देवई य भत्तुणो चलचित्तत्तणमसद्दहंती गया गुरुसमीवे । कहिओ वुत्तंतो । तेहि वि समप्पिओ पडिजोगो । दिण्णो तीए तस्स । जाओ सहावत्थो । तओ पुच्छियं तेण 'किमेयं ?' ति । माणुसेहिं भणियं – 'तए भिक्खूण भोयणं सज्जावियं' ति । तेण भणियं – 'णाहं जिणजइणो मोत्तूण अन्नेसिं धम्मट्ठा पयच्छामि ।' कहिओ य देवईए सव्वो वि परमत्थो । तओ 'गुरुणिग्गहेण मणागं छलिओ मि' त्ति भणंतेण 'फासुएसणिज्जं' ति काऊण पडिलाहिया मुणिणो ।

---

## शब्दार्थ व टीपा

**वच्छाजणवयालंकारभूया** (वि.) (स्त्री.) - वत्स नावाच्या जनपदाला (प्रदेशाला) अलंकारभूत असलेली (कौशांबी नगरी).

**जीवाऽजीवाइपयत्थ वियक्खणा** - जैन तत्त्वज्ञानात वर्णिलेल्या जीव-अजीव इ. पदार्थांच्या वर्णनात (ज्ञानात) (विचक्षण असलेली देवकी), सप्त पदार्थांची नावे - जीव, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष.

**जिणसाहुपयपंकयमहुयरी** (वि.) (स्त्री.) - जिन आणि साधू यांच्या पदकमलांकडे आकृष्ट होणारी जणू मधुकरी (भ्रमरी).

**कंदुगलीला** (स्त्री.) - कन्दुकलीला, चेंडूचा खेळ.

**ललमाणी** - क्रि. 'लल', व का. धा. वि., स्त्रीलिंगी प्रथमा एकवचन, खेळणारी.

**पाडलीउत्त** - पाटलीपुत्र नावाचे नगर, आधुनिक बिहारमधील 'पाटणा'.

**विसमसर** (पुं.) - विषमशर, कामदेव, मदन.

**निवाय** (पुं.) - निपात, पडणे, कोसळणे.

**विहुरिज्जमाण-माणस** (वि.)- ज्याचे मन विह्वल झाले आहे असा.

**रूवाइसओ** (संधि) - रूव+अइसओ । रूपातिशय, उत्कृष्ट सौंदर्य.

**वरावेमि** (क्रि.) - 'वर', प्रयोजक, वर्तमानकाळ, प्रथम पुरुष एकवचन, विवाह करावयास लावेन.

**वरणत्थं** (क्रि. वि.) - वरण करण्यासाठी, विवाह करण्यासाठी.

**अण्णधम्मिओ** (वि.) (पुं.) - परधर्मीय.

**कवडसावगो** (समास) - कवडो सावगो । (कर्मधारय) कपट श्रावक, खोटा-खोटा श्रावक.

**सिद्धंतायन्नणाईहि** (संधि) - सिद्धंत+आयन्नण+आईहि । सिद्धांताचे श्रवण इत्यादींनी.

**परिणओ** - समजला, आकलन झाला.

**समुव्वूढा** - विवाह करून दिला.

**'भिन्नधम्माणि मायापियाणि' त्ति कयं जुयहरयं** - 'हिचे मातापिता वेगळ्या धर्माचे आहेत', असे म्हणून वेगळे घर करून दिले.

**जणणी-जणगाइ ता तस्स भणियाइं भिक्खुएहिं** - (देवानंदाच्या) मातापित्यांना त्यांच्या पुरोहितांनी म्हटले.

**भलेस्सामि** - पाहून घेईन, बघून घेईन.

**गुरुणिग्गहछिंडियं** - गुरूंनी (पुरोहितांनी) आग्रहपूर्वक छेडल्यामुळे.

**पुव्वब्भासेण** (क्रि. वि.) - पूर्व अभ्यासाने, जुन्या सवयीमुळे.

**भक्खियमणेण** (संधी) - भक्खियं+अणेण । त्याने खाल्ले.

**परावत्तियभावो** - वृत्ती पालटलेला, स्वभाव बदललेला (असा तो देवानंद).

**काउमाढत्ताणि** (संधि) - काउं+आढत्ताणि । (सांगितल्याप्रमाणे) करू लागले.

**भत्तुणो** - पतीचे.

**असद्दहंती** (वि.) (स्त्री.) - श्रध्दा नसलेली.

**पडिजोगो** - विशिष्ट मंत्र, तोडगा.

**जाओ सहावत्थो** - पुन्हा मूळ स्वभावात परत आला.

**णाहं पयच्छामि** - मी (भोजनदान) देणार नाही.

**मणागं छलिओ** - थोडासा विचलित झालो.

**फासुएसणिज्जं** - जैन साधूंना चालणारे प्रासुक आणि एषणीय असे अन्न.

**पडिलाहिया मुणिणो** - मुनींना भिक्षादान दिले.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) देवईए वरणत्थं देवानंदेण किं कयं ?

(२) देवानंदस्स मायापिउणा किंकारणेण तेसिं भिन्नघरयं कयं ?

(३) काए जुत्तीए देवानंदो सहावत्थो जाओ ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) कोणत्या प्रसंगी देवानंद देवकीच्या प्रेमात पडला ? पित्याने त्यांच्या विवाहास का नकार दिला ?

(२) देवकीच्या पित्याने अखेरीस देवानंद व देवकीचा विवाह का करून दिला.

(३) देवानंद व देवकीच्या धार्मिक आचरणाचे थोडक्यात वर्णन करा.

(४) ब्राह्मण भिक्षूंसाठी भोजन तयार करण्याची आज्ञा देवानंदने का दिली ? देवकीने त्याचे मन कसे वळविले ?

**प्र ३ : व्याकरण**

**अ) संधी सोडवा.**

चिंतियमणेणं, काउमाढत्ताणि, अम्हऽवरोहेण, पुव्वब्भासेण

**ब) रूपे ओळखा.**

मुणिणो, छलिओ, पुच्छियं, सज्जेह, भाविऊण

**विशेष अभ्यास**

जैन तत्त्वज्ञानातील सात पदार्थांची आणि नऊ तत्त्वांची नावे व त्यांचे अर्थ शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.

❑ ❑ ❑